# दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेवतीने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना सुरु करणेत आलेली आहे. या योजनेचा मुख्य हेतू ग्रामीण भागातील 15 ते 35 वयागटातील युवक/युवतींना कौशल्य प्रशिक्षण देवून रोजगार (नोकरी) उपलब्ध करुन देणेचा आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये दोन वर्षात या योजनेंतर्गत अंदाजे 40 हजार प्रशिक्षित मनुष्यबळ विविध क्षेत्रात पुरवणेचे आहे.

याचाच एक भाग म्हणून कोल्हापूर जिल्हयासाठी येत्या दोन वर्षात (2016-17 व 2017-18) 1035 इतक्या ग्रामीण भागातील युवक/युवतींना प्रशिक्षण देवून रोजगार (नोकरी) उपलब्ध करुन देणेचे उद्दिष्ट आहे. प्रशिक्षणार्थी निवडताना खालील निकषानुसार प्राधान्य देणेत येणार आहे.

1) महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमध्ये किमान 100 दिवस ज्या कुटुंबाने काम केले आहे, अशा कुटुंबातील 15 ते 35 वयोगटातील सदस्य
2) महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमध्ये किमान 15 ते 99 दिवस ज्या कुटुंबाने काम केले आहे, अशा कुटुंबातील 15 ते 35 वयोगटातील सदस्य
3) सन 2002 चे सर्वेक्षणानुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील सदस्य
4) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत महिला स्वयंसहाय्यता समुहातील सदस्यांच्या कुटुंबातील युवक/युवती

या निकषानुसार प्रशिक्षणार्थींना प्राधान्य देणेत येणार आहे. यामध्ये सामाजिक आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

| अनु. जाती / अनु. जमाती | अल्पसंख्यांक | इतर | महिला | अपंग |
|---|---|---|---|---|
| 50% | 15% | 35% | 1/3 | 3% |

**अंमलबजावणी प्रक्रिया**

1) लाभार्थींना 3 महिण्याचे प्रशिक्षण मोफत दिले जाते. (यामध्ये निवास,नाष्टा व भोजनाची सोय मोफत आहे.)
2) प्रशिक्षणानंतर रोजगार (नोकरी) मिळण्याची निश्चिती केली जाते.
3) रोजगार मिळालेल्या युवक/युवतींना किमान वेतन किंवा अधिक पगार मिळतो.

**कोल्हापूर जिल्हयासाठी प्रशिक्षण देणा-या संस्था**

| अ. क्र. | प्रशिक्षण संस्थेचे नाव | केंद्र | सेक्टर | सबसेक्टर | जिल्हयाचे उद्दिष्ट |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मानव विकास एवंम सेवा संस्था, लखनऊ | कोल्हापूर | रिटेल | ट्रेनी असोसिएट | 105 |
| | | | टुरिझम ॲन्ड हॉस्पिटॅलिटी | हाऊस होल्ड सर्व्हिसेस | |
| | | | टुरिझम ॲन्ड हॉस्पिटॅलिटी | फुड ॲन्ड बेवरेजेस असिस्टंट | |
| 2 | एमपीटीए एज्युकेशन लिमीटेड | पुणे | शोरुम हॉस्टेस | ॲटोमोटीव्ह | 100 |
| | | | एसब्लाय लाईन ऑपरेटर | इलेक्टॉनिक्स | |
| | | | ॲक्सेसरीज फिटर | ॲटोमोटीव्ह | |
| | | | फिटर मॅकॅनिकल एसब्ली | कॅपिटल गुड्स | |
| | | | वेल्डींग असिस्टंट | ॲटोमोटीव्ह | |
| 3 | श्री टेक्नॉलॉजिस | पुणे | इन्व्हेंटरी क्लर्क | लॉजिस्टिक्स | 110 |
| | | | हाऊसकिपींग अटेंडन्ट | टुरिझम ॲन्ड हॉस्पिटॅलिटी | |
| | | | फुड ॲन्ड बेवरेजेस असिस्टंट | टुरिझम ॲन्ड हॉस्पिटॅलिटी | |
| 4 | स्कीलमास्टर टेक्नॉलॉजिस ॲन्ड सोल्युशन्स प्रा.लि. | पुणे | फ्रंट ऑफिस कम रिसेप्सनिस्ट | टुरिझम ॲन्ड हॉस्पिटॅलिटी | |
| | | | आयटीइएस | अकौंटंट असिस्टंट टॅली | |
| | | | टुरिझम ॲन्ड हॉस्पिटॅलिटी | हॉस्पिटॅलिटी असिस्टंट | |
| 5 | अपोलो मेड स्किल्स | पुणे (लोणावळा) | हेल्थ केअर | होम हेल्थ ॲड | 200 |
| | | | हेल्थ केअर | जनरल डयुटी असिस्टंट | |
| | | | हेल्थ केअर | फार्मासी असिस्टंट | |
| | | | हेल्थ केअर | इमरजेंन्सि मेडीकल टेक्निशियन | |
| 6 | लर्निंग टुल्स प्रा.लि. | सोलापूर | | | 100 |

कोल्हापूर जिल्हयामध्ये मानव विकास एवंम सेवा संस्था यांनी टुरिझम ॲन्ड हॉस्पिटॅलिटी या सेक्टरमधील एक बॅच सुरु केली आहे, यामध्ये कोल्हापूर जिल्हयातील 27 व रत्नागिरी जिल्हयातील 8 असे एकूण 35 प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत.




मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक -प्रशिक्षणार्थीना गणवेश वाटप करताना



मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक प्रशिक्षणार्थीचे अभिनंदन करताना